N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** जत
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0602 **Year (वर्ष):** 2022
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/10/2022 04:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 14/10/2022
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/10/2022
**Time From (वेळेपासून):** 11:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/10/2022 **Time (वेळ):** 03:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/10/2022 03:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिप कन्नड शाळा सिंधीहाळ्ळ वस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) Name (नाव): अनिल विठ्ठल हंकारे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दरीकोनुर,जत,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कवठेमहंकाळ,जत,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
Mobile (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रतीलाल मयाप्पा साळुंके | | | 1. डोणज ,मंगळवेढा,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | कांताप्पा दुंडाप्पा सन्नोळी | | | 1. बेलदार गल्ली जत,जत,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब ता. 15.10.2022

मी अनिल विठ्ठल हंकारे वय 34 वर्ष व्यवसाय:- नोकरी, सहाय्यक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा दरीकोणूर ता.जत जि.सांगली रा. मु.पो. सैनिक कॉलनी, धुळगांव रोड कवठेमहंकाळ ता.कवठेमहंकाळ जि.सांगली सध्या रा.दरीकोणूर ता.जत जि.सांगली मो.नं. 9922671433.

मी सैनिक कॉलनी, धुळगांव रोड कवठेमहंकाळ ता.कवठेमहंकाळ जि.सांगली या ठिकाणी माझे आई,वडील व भाऊ यांचेसोबत राहण्यास असून माझ्या नोकरी निमीत्त दरीकोणूर ता.जत जि.सांगली या ठिकाणी असतो.

मी जत तालुक्याचा एक अभ्यास या विषयाची पी.एच.डी. करीत असून सदर पी.एच.डी.ची थेसीस जमा करणे व त्या संदर्भात अभ्यास व मुलाखती घेण्यासाठी मला तीन महीन्याच्या अर्जीत रजेची आवश्यकता आहे. त्या करीता मी काम करीत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा दरीकोणूर येथील मुख्याध्यापक श्री.राजकुमार येडवे यांचेकडे अर्जीत रजेसाठी अर्ज सादर करणार आहे. सदर अर्जीत रजा गट शिक्षण अधिकारी पंचायत समीती जत यांचेकडून मंजूर करून घ्यावी लागते. त्या करीता मी दि.03.10.2022 रोजी श्री.साळुंके गट शिक्षण अधिकारी यांची भेट घेवून त्यांना माझी रजा मंजूर करून देण्यासाठी विनंती केली असता श्री.साळुंके साहेब यांनी मला जिल्हा परिषद कन्नड शाळा सिंधिहळ्ळ वस्ती, मुचंडी ता.जत येथील उप शिक्षक श्री.सन्नोळी यांना संपर्क करून भेट घेण्यास सांगीतले होते. त्याप्रमाणे मी श्री.सन्नोळी यांची भेट घेवून माझ्या रजे संदर्भात विचारले होते. त्यावेळी सन्नोळी यांनी मला तिन महिन्याची रजा मंजूर करून देण्यासाठी गट शिक्षण अधिकारी श्री.साळुंके साहेब यांना प्रत्येक महिन्याला 20,000/- रूपये प्रमाणे पैशाचे पाकिट द्यावे लागेल असे सांगीतले होते.

त्यानंतर मी दि.05.10.2022 रोजी श्री.सन्नोळी यांना संपर्क करून माझे रजेसंदर्भात साहेबांना विनंती करण्यास सांगीतले असता त्यावेळी श्री.सन्नोळी यंानी माझ्या रजेचे साहेबांकडून काम करून देत असल्याचे सांगून साहेबांना पाकिट द्यावे लागेल असे सांगीतले.

गट शिक्षण अधिकारी श्री.साळुंके व श्री.सन्नोळी उप शिक्षक हे माझ्याकडून लाच घेतल्या शिवाय माझी अर्जीत रजा मंजूर करणार नाहीत अशी माझी खात्री झाली होती मला त्यंाना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि. 06.10.2022 रोजी मी श्री.सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांची भेट घेवून माझी तक्रार असल्याचे सांगीतले होते. घाटगे साहेब यांनी त्यांचे कार्यालयातील श्री. विनायक भिलारे पोलीस निरीक्षक यांची ओळख करून दिली. मी श्री.साळुंके व श्री. सन्नोळी यांचे विरूध्दचा तक्रारी अर्ज भिलारे साहेब यांचे समक्ष हजर केला. भिलारे साहेब यांनी त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती दिली. मी भिलारे साहेब यांना त्या दिवशी रजे संदर्भात चर्चा करण्यासाठी श्री.सन्नोळी व श्री.साळुंके यांची भेट घेण्यास जाणार असल्याचे सांगीतलेने भिलारे साहेब यांनी त्या दिवशी पडताळणी करण्याचे ठरवले. भिलारे साहेब यांनी मला जत या ठिकाणी जाऊन थांबण्यास सांगून संपर्क केल्यानंतर भेट घेण्यास सांगून जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी सांगली येथून रवाना होऊन जत या ठिकाणी जाऊन थांबलो.

त्यानंतर सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास श्री.घाटगे साहेब यांनी संपर्क करून बोलावून घेतल्याप्रमाणे मी जत शहराच्या बाहेर नागज ते जतकडे येणा-या रोडवर जाऊन त्यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचेसोबत भिलारे साहेब व त्यांचे पथक हजर होते. भिलारे साहेब यंानी त्यांचे सोबत आलेले
दोन शासकीय पंच तसेच त्यांचा स्टाफ यांची ओळख करून दिली.

भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. नंदकुमार गुंडा अकले यांची पंच नं. 1 म्हणुन व श्री. संजय इरगोंडा पाटील यांची पंच नं. 2 म्हणुन काम निवड केली. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला त्यांनी तो वाचून त्यावर सह्या केल्या.



Scanned with OKEN Scanner

भिलारे साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये मेमरी कार्ड टाकले. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्या 9284423697 या मोबाईल क्रमांकावरून सन्नोळी यांचे 7719838361 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करून माझ्या मोबाईलचा स्पिकर फोन ऑन करून सन्नोळी यांचेशी बोलणे केले. सन्नोळी यंानी मला तहसिलदार कार्यालयात असल्याचे सांगून पाच मिनीटात येत असल्याचे संागीतले. सदरचा कॉल भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड केला आहे. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच अकले यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच अकले असे माझ्याकडील हिरो होन्डा स्प्लेंडर कंपनीची मोटरसायकल रजि. क्र. एम.एच.10 ए.एम. 0939 वरून रवाना होवून पंचायत समिती कार्यालय जत येथे गेलो त्या ठिकाणी सन्नोळी व गट शिक्षण अधिकारी साळुंके साहेब हे कुठेही दिसले नाहीत. त्यामुळे मी माझ्या मोबाईलवरून श्री.सन्नोळी यंाना संपर्क करून माझ्या मोबाईलचा स्पिकर फोन ऑन करून त्यांचेशी बोलणे केले. सन्नोळी यंानी मला साहेबांना भेटणार आहे काय असे विचारले असता मी त्यांना साहेबांना भेटणार असल्याचे संागीतले. सन्नोळी यंानी मला साहेबांना विचारून फोन करतो असे म्हणाले. मी सन्नोळी यांचेकडे रजे संदर्भात विषय काढल्यानंतर सन्नोळी यंानी माझे काम साहेबांना सागून करून देत असल्याचे संागून कॉल केट केला. त्यानंतर मी व पंच अकले त्या ठिकाणावरून निघून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर भिलारे साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर भिलारे साहेब यांनी विचारले वरून पंच अकले व त्यानंतर मी घडलेली हकिगत भिलारे साहेब यांना सांगीतली. त्यानंतर भिलारे साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व श्री. सन्नोळी यांचेत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला सन्नोळी यांनी संपर्क केल्यानंतर तात्काळ कळविण्याबाबत सुचना देऊन मला जाण्यास सांगीतले.

दि.11.10.2022 रोजी आमचे शाळेच्या वार्षीक तपासणी साठी श्री.साळुंके गट शिक्षण अधिकारी व सन्नोळी सर हे आमचे शाळेमध्ये येणार असल्याने व त्यावेळी सन्नोळी किंवा साळुंके साहेब हे माझ्याकडे पैशांची मागणी करतील असे वाटत असल्याने मी घाटगे साहेब यांना संपर्क करून माहिती दिली. त्यानंतर श्री.घाटगे साहेब, भिलारे साहेब व त्यांचे पथक असे दरिकोणूर या ठिकाणी आल्यानंतर सव्वा तीन वाजण्याचे सुमारास मी त्यांची भेट घेतली. त्यावेळी भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये मेमरी कॉर्ड टाकले. भिलारे साहेब यांनी मला व पंच अकले यांना पडताळणी कामी आवश्यक सुचना दिल्या. भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे दिला.मी तो माझे पॅन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच अकले असे माझ्याकडील मोटरसायकल वरून रवाना होवून मी काम करीत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा दरीकोणूर या ठिकाणी दाखल झालो. त्यावेळी आमचे शाळेमध्ये वार्षीक तपासणी कामी गट शिक्षण अधिकारी श्री.साळुंके साहेब व त्यांचे सोबत सन्नोळी सर आलेले होते. श्री.साळुंके साहेब यांनी आमचे शाळेच्या वार्षीक तपासणीचे काम केले. तपासणी करून जात असताना मी सन्नोळी सर यांना माझ्या पी.एच. डी.साठीच्या रजेबाबत साळुंके साहेब यांचेशी चर्चा करण्याबाबत विनंती केली त्यावेळी सन्नोळी यांनी मला साहेबांना सांगतो असे सागून यांनी माझ्यापासून लांब जावून साळुंके साहेब यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मी साळुंके साहेब यांना 90 दिवसांच्या रजेचा अर्ज देऊन त्यांचेशी रजेबाबत चर्चा केली. त्यावेळी साळुंके साहेब यांनी मला तीन महिन्याची रजा कशाला लागते एक महीन्याची घ्या असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे म्हणालो. त्यानंतर साळुंके साहेब व सन्नोळी सर आमचे शाळेतून निघून गेले. त्यानंतर मी व पंच अकले त्या ठिकाणावरून निघून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर भिलारे साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर भिलारे साहेब यांनी विचारले वरून पंच अकले व त्यानंतर मी घडलेली हकिगत भिलारे साहेब यांना सांगीतली. त्यानंतर भिलारे साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व श्री.सन्नोळी तसेच साळुंके साहेब यांचेत झालेले संभाषण ऐकले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला सन्नोळी यांनी संपर्क केल्यानंतर तात्काळ कळविण्याबाबत सुचना देऊन मला जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी निघून आलो. त्यानंतर त्या दिवशी सायंकाळी सन्नोळी सर यांनी मला दुस-या दिवशी भेटण्याबाबत व्हाट्स अ◌ॅप मेसेज व्दारे कळविले. त्याप्रमाणे मी भिलारे साहेब यांना कळविले. भिलारे साहेब यांनी सन्नोळी सर काम करीत असलेल्या सिंधिहळ्ळ वस्ती, मुचंडी येथील शाळेजवळ भेटण्याचे ठरवले.

दि.12.10.2022 रोजी दुपारी 12 वाजण्याचे सुमारास भिलारे साहेब यांनी संपर्क केल्याप्रमाणे सिंधिहळ्ळ वस्ती पासून जत रोडवर असलेल्या हॉटेल सोनाई जवळ भेट घेतली. त्यावेळी भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये मेमरी कार्ड टाकले. भिलारे साहेब यांनी मला व पंच अकले यांना पडताळणी कामी आवश्यक सुचना दिल्या. भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो



Scanned with OKEN Scanner

माझे पॅन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच अकले असे माझ्याकडील मोटरसायकल वरून रवाना होवून जिल्हा परिषद कन्नड शाळा सिंधिहळ्ळ वस्ती, मुचंडी येथे दाखल झालो. मी व पंच अकले असे शाळेमध्ये जावून सिन्नोळी सर यांची भेट घेतली. त्यावेळी सन्नोळी सरांनी मला मुचंडीच्या स्टँडवर पाहूणे आले असल्याचे सांगून त्या ठिकाणी जावून येवूया असे म्हणाले. सन्नोळी सरांनी सांगीतले प्रमाणे मी त्यांना माझ्याकडील मोटरसायकलवर घेवून मुचंडी येथील स्टँडवर गेलो. पंच अकले शाळेत थांबले होते. मी व सन्नोळ सर असे मुचंडी स्टँडवर गेल्यानंतर सन्नोळी सरांनी त्यांचे पाहूण्यांची भेट घेतली. त्यानंतर मी व सन्नोळी सर पुन्हा त्यांचे शाळेत आलो. मी सन्नोळी सरांना माझ्या रजेबाबत विचारणा करून साहेबांशी चर्चा करण्याबाबत विनंती केली. त्यानंतर आमचेत मी करीत असलेल्या पी.एच.डी बाबत तसेच रजेबाबत चर्चा झाली. सन्नोळी सरांनी मला त्यांच्या मोठ मोठ्या अधिका-यांशी ओळखी असल्याचे तसेच यापुर्वीच्या शिक्षण अधिकारी यांचेशी असलेल्या ओळखीबाबत माहिती देऊन वेगवेगळी उदाहरणे दिली. मी सन्नोळी सरांना तीन महिन्यांची रजा पाहिजे असल्याचे सांगीतले. त्यावर सन्नोळी सरांनी मला एक एक महिन्यांची रजा घेण्याबाबत सांगून एक महिना झाला की हजर होवून पुन्हा रजेवर जाण्याबाबत सल्ला देवून एक एक महिन्यांचा रजेचा अर्ज करण्यास सांगीतले व त्याप्रमाणे मी दि.11.10.2022 रोजी साळुंके साहेब यांचेकडे दिलेला 90 दिवसांचा अर्ज मला परत दिला. सिन्नोळी सरांनी मला साहेबांना किती सांगायचे असे विचारले. त्यावर सन्नोळी सरांनी मला तुम्हीच सुचवा असे सांगून साहेबांना बालतो, असे म्हणाले. सन्नोळी सरांनी मला आर्थिक नुकसान होऊ देत नसल्याचे सांगून साहेबांना खुश करा असे म्हणून "तुमचा पण फायदा आणि त्यांनाही चार रुपये मिळतात" असे म्हणाले. मी सन्नेळी सरांना साहेबांना बोलण्याबाबत विनंती केली. त्यावर सन्नोळी सरांनी मला "त्यांना द्यायला तयार आहेत का, तुम्ही सोडत असेल तर ते रजा द्यायला तयार आहेत, साहेब एवढच द्या म्हणून सांगत नसतात, या गोष्टी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना किती द्यायचे असे विचारले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्रं.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
सांगली शहर
**District** (जिल्हा): सांगली
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** rajesh narayanrao r
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPRNRN7901

ठाणे अंमलदार
जत पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner